मराठी

# बालभारती

इयत्ता पाचवी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन मंजुरी क्रमांक : प्राशिसं/२०१४-१५/ह/भाषा/मंजुरी/ड-५०५/७२७/दिनांक : २३/२/२०१५



# मराठी
# बालभारती
## इयत्ता पाचवी

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

9XGHIX

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

प्रथमावृत्ती : २०१५
सहावे पुनर्मुद्रण : २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा समिती :**

इरगोंडा पाटील (सदस्य)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
वाहरू सोनवणे (सदस्य)
प्रा. प्रज्ञा दया पवार (सदस्य)
डॉ. सुभाष सावरकर (सदस्य)
किशोर दरक (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य सचिव)

**मराठी भाषा समिती – कार्यगट सदस्य**

हरी गंगाधर नारलावार
प्रा. सर्जेराव रणखांब
श्रीमती रेणू दांडेकर
प्रा. जयवंत पाटील
डॉ. रोहिणी गायकवाड
डॉ. मंदा नांदूरकर
प्रा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो
प्रा. डॉ. सुनीता सुळेकर
प्राचार्य डॉ. गोविंद गायकी
डॉ. संध्या पवार
श्रीकांत चौगुले
पद्‌माकर कुलकर्णी
शिवा कांबळे
नीलेश निमकर
एकनाथ आव्हाड
अतुल कुलकर्णी
वेच्या रूध्या गावित

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी
श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख
विषय सहायक, मराठी

**चित्रकार** : राजेंद्र गिरधारी

**मुखपृष्ठ** : रेश्मा बर्वे

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
सचिन मेहता, निर्मिती अधिकारी
नितीन वाणी, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/1,00,000

**मुद्रक** : M/S. SHIVANI WEB OFFSET PRINTERS, HYDERABAD

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९' आणि 'राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा-२००५' डोळ्यांसमोर ठेवून राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम-२०१२' तयार करण्यात आला. या शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित इयत्ता पाचवी 'मराठी बालभारती' हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ व कवितांचा समावेश पाठ्यपुस्तकात केलेला आहे. पाठ व कविता यांच्याशी निगडित अधिकची माहिती 'माहिती मिळवूया' या शीर्षकाखाली दिली आहे. विद्यार्थ्यांना घर व परिसरातील व्यक्तींशी घटना-प्रसंगानुरूप बोलता यावे, स्वच्छता, पाणीटंचाई यांसारख्या समस्यांवर विचार करायला ते प्रवृत्त व्हावे, यासाठी पाठ्यपुस्तकांत प्रसंगचित्रे दिली आहेत. चित्रांचे निरीक्षण, त्यांवर विचार, चर्चा व त्यासंबंधी स्वतःचे अनुभवकथन यांतून विद्यार्थ्यांमध्ये जाणीव-जागृती निर्माण होईल.

भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी नावीन्यपूर्ण स्वाध्याय, उपक्रम व प्रकल्प दिलेले आहेत. 'शोध घेऊया, खेळ खेळूया, हे करून पाहा, खेळूया शब्दांशी' या शीर्षकांखाली दिलेल्या मजकुरांतून विद्यार्थ्यांच्या कृतिशीलतेला वाव दिला आहे. विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रांतील बातम्या बारकाईने वाचून त्यांवर विचार करावा, यासाठी काही बातम्यांचे नमुने, तसेच भाषेच्या व्यवहारातील वापराचे इतर नमुने उदा., जाहिरात, सूचना फलक, निवेदन, घोषवाक्ये इत्यादींचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांनी नवीन शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर सहजतेने करावा, तसेच त्यांच्यामध्ये व्याकरणविषयक जाण निर्माण व्हावी, म्हणून हे सर्व मनोरंजक व सोप्या पद्धतीने दिले आहे. विद्यार्थ्यांना स्वतःची कल्पकता वापरून लेखन करता यावे, विचार व्यक्त करता यावे, यासाठी वैविध्यपूर्ण प्रश्न व कृती पाठ्यपुस्तकात समाविष्ट केल्या आहेत. पाठ्यघटक कसे हाताळावे, याबाबत शिक्षकांना मार्गदर्शनपर सूचना अनेक ठिकाणी दिल्या आहेत.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. हे पाठ्यपुस्तक तयार करताना मराठी भाषा समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री. इरगोंडा पाटील यांनी मराठी भाषा समितीच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारून मोलाचे मार्गदर्शन केले. हे पुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, यासाठी राज्याच्या विविध भागांतील प्राथमिक शिक्षक, भाषातज्ज्ञ, अभ्यासक्रम समिती सदस्य यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले आहे. श्री. शिवाजी तांबे व श्रीमती उमा विसुभाऊ बापट या निमंत्रित तज्ज्ञांचेही सहकार्य लाभले. त्या सर्वांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून मराठी भाषा समितीने पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य, निमंत्रित तज्ज्ञ, संबंधित समीक्षक व चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

(चं. रा. बोरकर)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : ५ मार्च २०१५
भारतीय सौर १४ फाल्गुन १९३६

# इयत्ता पाचवी – मराठी अध्ययन निष्पत्ती

<table>
<tr><th>अध्ययनात सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया</th><th>अध्ययन निष्पत्ती</th></tr>
<tr><td>

**सर्व विद्यार्थ्यांना (वेगळ्या रूपात सक्षम मुलांसहित) वैयक्तिक, गटात कार्य करण्याची संधी आणि प्रोत्साहन मिळावे यासाठी –**

- विविध विषय, परिस्थिती, घटना, अनुभव, कथा, कविता इत्यादी स्वत:च्या पद्धतीने आणि आपल्या भाषेत (तोंडी/ लेखी/सांकेतिक स्वरूपात) सांगणे, प्रश्न विचारणे, टिपण करणे, आपले मत देणे यांसाठीचे स्वातंत्र्य दिले जावे.
- ग्रंथालय/वर्गात वेगवेगळ्या प्रकारच्या कथा, कविता, अथवा बालसाहित्य, स्तरांनुसार इतर साहित्य, जाहिरात फलक, वर्तमानपत्र यांतील कात्रणे उपलब्ध असावीत आणि यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.
- वेगवेगळ्या कथा, कविता, फलक इत्यादींना संदर्भानुसार वाचून समजणे-समजावणे, यांसाठी संधी दिल्या जाव्यात.
- ऐकलेल्या, पाहिलेल्या, वाचलेल्या गोष्टी आपल्या पद्धतीने आपल्या भाषेत लिहिण्याच्या संधी दिल्या जाव्यात.
- आवश्यकतेनुसार आणि संदर्भानुसार आपली भाषा समजून घेण्याची (नवीन शब्द/वाक्य इत्यादी) आणि त्याचा वापर करण्याची संधी दिली जावी.
- एकमेकांनी लिहिलेल्या गोष्टी ऐकणे, वाचणे आणि त्यावर आपले मत देणे, त्यात आपल्या विचारांची भर घालून विविध प्रकारे लिहिण्याची संधी दिली जावी.
- आजूबाजूला घडणाऱ्या क्रिया/घटना विचारात घेऊन प्रश्न विचारणे, मुलांशी चर्चा करणे, टिपण तयार करणे, मत देणे यासारख्या संधी उपलब्ध करून द्याव्या.
- आशयाच्या संदर्भाने वापरल्या जाणाऱ्या भाषेचे बारकावे आणि नियमबद्ध मांडणी समजून घेण्याची आणि त्याचा वापर करण्याची संधी दिली जावी.
- नवीन शब्द चित्र-शब्दकोश/शब्दकोश यातून पाहण्याची संधी उपलब्ध करून दिली जावी.
- इतर विषय, व्यवसाय, कला इत्यादींमध्ये (उदा. गणित, विज्ञान, सामाजिक अध्ययन, नृत्यकला, चिकित्सा इत्यादी) येणारे शब्द समजणे आणि त्यांचा संदर्भानुसार वापर करण्याची संधी दिली जावी.
- पाठ्यपुस्तक आणि त्याच्याशी संबंधित इतर साहित्यांत आलेल्या नैसर्गिक, सामाजिक आणि इतर संवेदनशील मुद्द्यांना समजून घेऊन त्यांवर चर्चा करण्याची संधी दिली जावी.

</td><td>

**अध्ययनार्थी –**

05.01.01 ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्यातील (विनोदी, साहसी, सामाजिक विषयांवरील कथा, कविता इत्यादी) विषय, घटना, चित्रं, पात्रं व शीर्षक यांबाबत चर्चा करतात, प्रश्न विचारतात, आपले मत देतात, तर्क करतात व निष्कर्ष काढतात.

05.01.02 आपल्या परिसरात घडणारे प्रसंग, घटना इत्यादींचे सूक्ष्म निरीक्षण करतात. त्यांवर तोंडी प्रतिक्रिया व्यक्त करतात, प्रश्न विचारतात.

05.01.03 भाषेच्या सूक्ष्म निरीक्षणातून स्वत:ची मौखिक भाषा तयार करतात.

05.01.04 विविध प्रकारच्या साहित्यातील (उदा. वर्तमानपत्रे, बालसाहित्य, पोस्टर इत्यादींमधील) संवेदनशील मुद्द्यांवर आपले मत/विचार व्यक्त करतात. उदा. 'कठीण समय येता' हा पाठ वाचून मुले म्हणतात, 'आम्ही नेहमीच इतरांना मदत करतो.'

05.01.05 भिन्न परिस्थिती आणि उद्देशांसाठी (फलकावरील सूचना, कार्यअहवाल, माहिती इत्यादी मिळवण्यासाठी) वाचतात, लिहितात.

05.01.06 आपल्या पाठ्यपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य (वर्तमानपत्रे, बालसाहित्य, मोठे फलक इत्यादी) समजून घेऊन वाचन करतात, त्यांविषयी बोलतात.

05.01.07 अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशामधून शोधतात.

05.01.08 स्वत:च्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरवलेल्या कृतीअंतर्गत लेखनप्रक्रिया उत्तम तऱ्हेने समजून स्वत:चे लेखन पडताळतात. लेखनाचा उद्देश व वाचक यानुसार आवश्यक बदल करतात. उदा. एखाद्या घटनेबाबतची माहिती सांगण्यासाठी शालेय भित्तिपत्रिकेत लेखन करतात किंवा मित्रास पत्र लिहितात.

05.01.09 भाषेतील बारकावे, नियम इत्यादींचा विचार करून स्वत:ची भाषा तयार करतात आणि त्याचा आपल्या लेखनात/ब्रेल लिपीत समावेश करतात.

05.01.10 भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक (उदा. विरामचिन्ह, काळ, क्रियापद, लिंग, वचन) ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

05.01.11 भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा (उदा. पूर्णविराम, स्वल्पविराम, अर्धविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह) जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.

05.01.12 स्तरांनुसार इतर विषय, व्यवसाय, कला इत्यादींमध्ये (गणित, विज्ञान, सामाजिक अध्ययन, नृत्यकला, चिकित्सा इत्यादींमध्ये) येणाऱ्या शब्दांचा अर्थ समजून घेऊन लेखनात संदर्भानुसार योग्य वापर करतात.

05.01.13 आपल्या परिसरात घडणाऱ्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करून त्यांबाबत लिखित स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त करतात.

05.01.14 पाठ्यपुस्तक आणि इतर लेखनप्रकारांतील संवेदनशील विषयावर लिखित स्वरूपात/ब्रेल लिपीमध्ये अभिव्यक्त होतात.

05.01.15 आपल्या कल्पनेने कथा, कविता, पत्र इत्यादी लिहितात. कथा, कविता यांमध्ये स्वत:च्या शब्दांची भर घालून लेखन करतात.

</td></tr>
</table>

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | माय मराठी! (गाणे) | संजीवनी मराठे | १ |
| २. | बंडूची इजार (चित्रकथा) | — | २ |
| ३. | वल्हवा रं वल्हवा (गाणे) | वसंत बापट | ७ |
| ४. | सावरपाडा एक्स्प्रेस : कविता राऊत | संतोष साबळे | ८ |
| ५. | मुंग्यांच्या जगात | प्रकाश किसन नवाळे | १३ |
| ६. | माहेर (कविता) | सदाशिव माळी | १६ |
| ७. | अरण्यलिपी | सुरेशचंद्र वारघडे | १८ |
| ८. | प्रिय बाई... | — | २२ |
| ९. | जनाई | शंकर पाटील | २५ |
| १०. | रंग जादुचे पेटीमधले (कविता) | पद्‌मिनी बिनीवाले | २९ |
| ११. | कठीण समय येता... | मनोहर भोसले | ३२ |
| १२. | माळीण गाव : एक घटना | — | ३६ |
| १३. | सण एक दिन! (कविता) | यशवंत | ३८ |

| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १४. | राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज | सुदाम सावरकर | ४१ |
| १५. | आपल्या समस्या - आपले उपाय | — | ४३ |
| १६. | स्वच्छतेचा प्रकाश | यदुनाथ थत्ते<br>डॉ. अनिल गोडबोले | ४५ |
| १७. | पुस्तके (कविता) | सफदर हाश्मी (अनुवादित) | ४८ |
| १८. | कारागिरी | डॉ. सरोजिनी बाबर | ५१ |
| १९. | वासरू (कविता) | अनिल | ५५ |
| २०. | माझं शाळेचं नक्की झालं! | विमल मोरे | ५७ |
| | • वाचूया, समजून घेऊया. | — | ६१ |
| २१. | प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा (कविता) | गौरीशंकर गंगा | ६५ |
| २२. | अति तिथं माती | द. मा. मिरासदार | ६८ |
| २३. | छत्रपती राजर्षी शाहूमहाराज | श्रीराम पचिंद्रे | ७३ |
| २४. | कापणी (कविता) | बहिणाबाई चौधरी | ७६ |
| २५. | ढोल | संजय लोहकरे | ७९ |
| २६. | पाण्याची गोष्ट | — | ८२ |
| २७. | अभंग | संत जनाबाई<br>संत सेनामहाराज<br>संत नामदेव | ८८ |